मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

जा.क्र.मनपा/आस्था/2968/2024-25 दि.28/01/2025

ई-ऑफिस फाईल क्र.995725, दि.28/01/2025 रोजीची मंजूरी

प्रति,
मे. देवमामलेदार स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित,
न्यु प्लॉट, नियर प्रायमरी स्कुल,
सटाना, ता.सटाना, जि. नाशिक,
पिन कोड - 423301

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागामध्ये प्रशासकीय कामकाज करणेकरीता ठेका पध्दतीने कनिष्ठ अभियंता पुरवठा करणेबाबतचा ठेका रद्द करणेबाबत.

संदर्भ :-
1. दि.08/11/2021 रोजीचा करारनामा
2. जा.क्र.मनपा/आस्था/1475/2021-22, दि.01/12/2021 रोजीचा कार्यादेश.
3. जा.क्र.मनपा/आस्था/1670/2022-23, दि.19/10/2022 रोजीचा सुधारीत आदेश.
4. जा.क्र.मनपा/आस्था/109/2023-24, दि.18/04/2023 रोजीचा कार्यादेश.
5. जा.क्र.मनपा/आस्था/1573/2023-24, दि.22/09/2023 रोजीचा मुदतवाढ कार्यादेश
6. जा.क्र.मनपा/आस्था/2569/2024-25, दि.11/12/2024 रोजीचा मुदतवाढ कार्यादेश
7. जा.क्र.मनपा/आस्था/2179/2023-24, दि.12/12/2023 रोजीची नोटीस.
8. जा.क्र.मनपा/आस्था/2823/2023-24, दि.15/02/2024 रोजीची नोटीस.
9. जा.क्र.मनपा/आस्था/2892/2023-24, दि.23/02/2024 रोजीची नोटीस.
10. जा.क्र.मनपा/आस्था/3033/2023-24, दि.11/03/2024 रोजीची नोटीस.
11. जा.क्र.मनपा/आस्था/29/2024-25, दि.10/04/2024 रोजीची नोटीस.
12. जा.क्र.मनपा/आस्था/185/2024-25, दि.13/05/2024 रोजीची नोटीस.
13. जा.क्र.मनपा/आस्था/345/2024-25, दि.10/06/2024 रोजीची नोटीस.
14. जा.क्र.मनपा/आस्था/353/2024-25, दि.11/06/2024 रोजीची नोटीस.
15. जा.क्र.मनपा/आस्था/1863/2024-25, दि.13/09/2024 रोजीची नोटीस.
16. जा.क्र.मनपा/आस्था/2588/2024-25, दि.12/12/2024 रोजीची नोटीस.
17. जा.क्र.मनपा/आस्था/2837/2024-25, दि.15/01/2025 रोजीची नोटीस.

<u>आदेश</u>

ज्याअर्थी, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागामध्ये प्रशासकीय कामकाज करणेकरीता ठेका पध्दतीने कनिष्ठ अभियंता पुरवठा करणेबाबत आपणासोबत संदर्भ क्र.01 अन्वये करारनामा करण्यात आला असून संदर्भ क्र.02 ते 06 अन्वये आपणांस एकुण 49 ठेका कनिष्ठ अभियंता पुरवठा करणेबाबत कार्यादेश देण्यात आलेला आहे.

आणि ज्याअर्थी, करारनाम्यातील अट क्र.32 मध्ये “व्दितीय पक्षकारास कामाचा महिना संपताच कर्मचाऱ्यांच्या वेतनाची मागणी महानगरपालिकेस सादर करावी व व्दितीय पक्ष यांनी प्रत्येक महिन्यास कामगारांना वेळच्या वेळी किमान वेतन कायद्यानुसार वेतन अदा (प्रत्येक महिन्याच्या 10

तारखेच्या आतमध्ये) करणे बंधनकारक राहिल", अशी तरतुद आहे. परंतु सदर तरतुदीनुसार आपण 10 तारखेच्या आत वेतन अदा केलेले नाही. ठेका कर्मचाऱ्यांचे वेतन मुदतीत अदा करणेबाबत यापूर्वी देखील आपणांस संदर्भ क्र.07 ते 17 अन्वये लेखी नोटीस बजाविण्यात आलेल्या आहेत व मौखिक सूचना देण्यात आलेल्या आहेत. सबब, कर्मचाऱ्यांचे वेतन 10 तारखेच्या आत अदा करीत नसल्यावरुन आपण करारनाम्यातील अट क्र.32 चा भंग केलेला आहे.

ज्याअर्थी, करारनाम्यातील अट क्र.27 मध्ये "कंत्राटदाराने महानगरपालिकेच्या कामकाजासाठी नेमलेल्या ठेका कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत कंत्राटदारावर किमान वेतन कायद्यातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्याचे कंत्राट/ठेका तात्काळ रदद करुन त्याचे नाव काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येईल", असे नमुद आहे. ठेका कनिष्ठ अभियंता यांचे देयक मनपा कार्यालयात सादर केल्यानंतर विहीत पध्दतीने देयक मंजूर झाल्यावर आपणांस धनादेशाव्दारे देयक मनपातर्फे अदा केले जाते. तथापि, आपण कनिष्ठ अभियंतांना वेतन प्रदान केल्यानंतर कनिष्ठ अभियंता यांना आपणांस सुमारे रु.5,000/- रोखीने परत द्यावे लागते याबाबत ठेका कनिष्ठ अभियंता यांनी शहर अभियंता यांना सांगितल्याचे शहर अभियंता यांनी कळविले आहे. म्हणजेच आपण कनिष्ठ अभियंता यांना किमान वेतन कायद्यातील तरतुदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे आढळून येत असल्याने आपण करारनाम्यातील अट क्र.27 चा भंग केलेला आहे.

ज्याअर्थी, करारनाम्यातील अट क्र.34 मध्ये "व्दितीय पक्षाच्या कामाबाबत अनियमितता, तक्रारी तसेच काम समाधानकारक न आढळल्यास सात दिवसाची लेखी नोटीस देऊन चर्चेअंती निर्णय घेऊन सदरचा ठेका रद्द करण्यात येईल" असे नमुद आहे.

आणि ज्याअर्थी, आपणांस वेळोवेळी नोटीस देऊन देखील आपण आपल्या कामात कोणतीही सुधारणा न करता कर्मचाऱ्यांचे वेतन मुदतीत अदा करत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

आणि त्याअर्थी, आपण करारनाम्यातील अट क्र.27, 32 व 34 चा भंग केल्याचे निदर्शनास आले आहे. तरी या उल्लंघनाबाबत आपणाविरुध्द इतर करावयाच्या कायदेशीर कार्यवाहीचा अधिकार राखून करारनाम्यातील अट क्र.27 नुसार आपणासोबत केलेला दि.08/11/2021 चा करारनामा रद्द करण्यात येऊन आपला ठेका रद्द करण्यात येत आहे, याची नोंद घ्यावी.

सबब आपला ठेका रद्द झालेला असल्याने दि.29/01/2025 पासून ठेका कनिष्ठ अभियंत्यांचा पुरवठा मनपास करण्यात येऊ नये.

Signed by
Kalpita Kishor Pimple
Date: 28-01-2025 23:40:04

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-

1. मा.आयुक्त महोदय
2. मा.अतिरिक्त आयुकत (1) व (2)
3. उप-आयुक्त (सर्व)
4. शहर अभियंता
5. सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख
6. निवडनस्ती